पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १८/१२/२०१९

## सर. कर्मचाऱ्यास जिवे ठार मारण्याच्या प्रयत्न करणाऱ्या आरोपीस ७ वर्ष कारावास व ४,०००/- रुपये दंड

=> जिल्हा सत्र न्यायाधीश, गडचिरोली श्री. स्वप्नील खटी यांचा न्यायनिर्णय

दिनांक २५/०६/२०१४ रोजी यातील आरोपी नामे साईनाथ नामदेव पासांडे वय २१ वर्ष व अरोपी शकिल जब्बार शेख वय ३० वर्ष दोन्ही रा. धानोरा ता. धानोरा जि. गडचिरोली यांनी संगनमत करुन. शासकीय कर्मचारी नापोशि/२५८६ अनिल दिवाकर सावसाकडे पोलीस स्टेशन धानोरा येथे नेमणुकीस असतांना फिर्यादी (कर्मचारी) हे आरोपी विरुध्द दारुच्या गुन्हा दाखल करीत असतांना वरील आरोपी यांनी " तु हमारे उपर वॉच करके दारु की केसेस करता है अब तेरा मर्डर ही करता हु" असे बोलुन कर्तव्यपार पाडण्यापासुन परावत्त करण्यासाठी फिर्यादीवर हमला करत काठीने व विटाने डोक्यावर वार करुन जिवे ठार मारण्याच्या प्रयत्न केला. अशाप्रकारे फिर्यादीचे रिपोर्ट वरुन व वैद्यकिय अहवालावरुन पोस्टे धानोरा येथे अप. क्र. २९/२०१४ कलम ३०७, ३५३, १८६, ३४ भादवी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपास सपोनि वैभव माळी यांनी तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. दरम्यान आरोपी क्र. १ साईनाथ नामदेव सापांडे हा मयत झाला आहे. सरकार तर्फे फिर्यादी व ईतर साक्षीदारांचे बयाण तसेच सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. न्यायालयाने दिनांक १७/१२/२०१९ रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांनी आरोपी क्र.२ शखील जब्बार शेख रा. धानोरा ता. धानोरा जि. गडचिरोली याला कलम ३०७, ३५३, १८६, ३४ भादवी मध्ये ७ वर्ष सक्षम कारावास व ४,०००/- रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सरकार पक्षातर्फे सहा. जिल्हा सरकारी वकील श्री. अनिल प्रधान व श्री. एस.यु. कुंभारे तसेच कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोनि श्री. प्रकाश तुनकलवार यांनी कामकाज पाहीले आहे.